आमदार स्थानिक विकास कार्यक्रम

सुधारित सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांकः स्थाविका-०६१६/ प्र.क्र.९६/का.१४८२
मंत्रालय, मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०००३२
दिनांक: १२ जुलै, २०१६

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांकः स्थाविका-२०११/ प्र.क्र-४७ /का-१४८२, दि.१३ सप्टेंबर, २०११

२) शासन निर्णय क्रमांकः स्थाविका-०५१६/प्र.क्र-७९/का-१४८२, दि. २१ जून, २०१६

प्रस्तावना :-

"लोकोपयोगी लहान कामांचा कार्यक्रम" राज्यात सन १९८४-८५ या वित्तीय वर्षापासून राबविण्यात येत आहे. सन १९९०-९१ मध्ये या कार्यक्रमाचे नामानिधान "स्थानिक विकास कार्यक्रम" असे करण्यात आले. सन १९९६-९७ पासून या कार्यक्रमाचे नाव "आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम" असे बदलण्यात आले. ज्या कामांना जिल्हा नियोजन समितीत प्राधान्य व महत्व मिळत नाही किंवा जी कामे जिल्हा योजनेत घेण्यात येत नाहीत अशी लोकोपयोगी कामे या योजनेतून घेतली जातात. हा कार्यक्रम राबविण्याची कार्यपद्धती व या कार्यक्रमांतर्गत कोणकोणती कामे हाती घेता येतील याबाबतचे मार्गदर्शन शासन स्तरावरुन वेळोवेळी करण्यात येते. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत,संदर्भाधीन शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक-स्थाविका-२०११/ प्र.क्र-४७ /का-१४८२ दि.१३ सप्टेंबर २०११, अन्वये सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच त्यामध्ये असलेल्या विविध तरतुदीमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले सर्व शासन निर्णय / शासन परिपत्रके व शासन पत्रे रद्द करुन सदर मार्गदर्शक सूचना अद्ययावत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

राज्य मंत्रीमंडळाच्या दि. ७ जून २०१६ रोजी झालेल्या बैठकीत, आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत होणाऱ्या कामांच्या व्याप्ती आणि कार्यपध्दती यामध्ये अध्ययन करून अधिक गतिमान पध्दतीने कामे होण्याकरिता अभ्यास करून अंतिम निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार संदर्भाधीन दि. २१ जून २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये, मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमडळ उपसमिती स्थापन करण्यात आली. सदर मंत्रीमंडळ उपसमितीची दि. २८जून २०१६ रोजी बैठक होऊन आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत निर्गमित करावयाच्या अद्ययावत सर्व समावेशक मार्गदर्शक सूचना अंतिम करण्यात आल्या.

शासन निर्णय :-

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत, यापूर्वी निर्गमित केलेल्या सर्व शासन निर्णयांचा तसेच खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास करून, होणाऱ्या कामांच्या व्याप्ती आणि कार्यपध्दती यामध्ये अध्ययन करून अधिक गतिमान पध्दतीने कामे होण्याकरिता, यापूर्वीचे सर्व शासन निर्णय / शासन परिपत्रके व शासन पत्रे अधिक्रमित करून सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना निश्चित करण्यात येत आहेत.

२. सदर मार्गदर्शक सूचनांची संक्षिप्त रुपरेषा पुढीलप्रमाणे आहे:-


| अ.क्र. | प्रकरण क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | - | शासन निर्णय | १ ते ४ |
| २ | १ | **पार्श्वभूमी**- कार्यक्रमाचे नामानिधान व उद्देश (१.१ ते १.३) | ५ |
| ३ | २ | **वैशिष्ट्ये** - अनुज्ञेय निधी (२.१ ते २.३), नोडल जिल्हा घोषित करावयाची पध्दत (२.४), अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कल्याणाकरिता राखीव निधी (२.५) | ६ |
| ४ | ३ | **अंमलबजावणी** - कामे सुचविण्याची पध्दत (३.१), कामांना मंजूरी देण्याची पध्दत (३.२ ते ३.४), कामे मंजूर करण्याबाबत सूचना (३.५ ते ३.१०), प्रशासकीय मान्यता (३.११ ते ३.२२) , कमाल आर्थिक मर्यादा (३.१६) , दिव्यांगाकरिता (अंध,अपंग,मूकबधीर,कर्णबधीर, शारिरिक व मानसिक विकलांग) विशेष तरतूद (३.२३), नोंदणीकृत सार्वजनिक ग्रंथालयाकरिता पुस्तके व इतर साहित्य (३.२४), अपारंपारिक उर्जा साधनांच्या प्रकल्पाची आस्थापना करणे (३.२५ ), क्रीडा क्षेत्र (३.२७), व्यायाम शाळा (३.२८), बार असोसिएशनच्या ग्रंथालयासाठी पुस्तके खरेदी करणे (३.२९), महानगरपालिका व "अ " वर्ग नगरपालिका क्षेत्रातील विशेष दुरुस्तीची कामे (३.३०), जलयुक्त शिवार योजना (३.३१), आमदार आदर्श ग्राम योजना (३.३२), स्मशानभूमी/ कब्रस्थानाची कामे (३.३३), माहिती व तंत्रज्ञान क्षेत्र (३.३४), शिक्षण क्षेत्र (३.३५), विज्ञान केंद्र (३.३६), सामाजिक सभागृह (३.३७), संबंधित प्रशासकीय विभागाच्या आर्थिक मर्यादा , अटी व शर्ती लागू रहाणे (३.३८), विशेष बाबींची प्रकरणे (३.३९), इतर विभागांनी निर्गमित केलेले शासन निर्णय / शासन परिपत्रक (३.४०) | ७ ते १५ |
| ५ | ४ | **निधी वितरण व व्यवस्थापन** (४.१ ते ४.६) | १६ |
| ६ | ५ | **संनियंत्रण** (५.१ ते ५.३), कामाची तपासणी (५.४ ते ५.६), कामांचे तपासणी अहवाल (५.७ ते ५.८), खर्च ताळमेळ (५.९) | १७ ते १८ |
| ७ | परिशिष्ट क्र-१ | आमदारांनी अनुज्ञेय कामांच्या शिफारशी करण्यासाठी नमुना | १९ |
| ८ | परिशिष्ट क्र-२ | या कार्यक्रमांतर्गत प्रतिबंधित कामे / बाबी (अ.क्र.१ ते १६) | २० |
| ९ | परिशिष्ट क्र- २ अ | खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमामध्ये अनुज्ञेय असलेली परंतु आमदार स्थानिक विकास कार्यक्रमामध्ये घेता येणार नाहीत अशी कामे (अ.क्र.१ ते १०) | २१ |
| १० | परिशिष्ट क्र- २ ब | खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमामध्ये अनुज्ञेय नसलेली परंतु आमदार स्थानिक विकास कार्यक्रमामध्ये अनुज्ञेय असलेली कामे यापुढेही चालू राहतील (अ.क्र.१ ते ७) | २२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | परिशिष्ट क्र- २ क | खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमात अनुज्ञेय नसलेली परंतु आमदार स्थानिक विकास कार्यक्रमामध्ये अनुज्ञेय असलेली विशेष दुरुस्तीची अनुज्ञेय कामे (अ.क्र.१ ते ६) | २३ |
| १२ | परिशिष्ट क्र- २ ड | खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमात अनुज्ञेय असलेल्या परंतु आमदार स्थानिक विकास कार्यक्रमामध्ये करावयाची बदलांसह अनुज्ञेय कामे (अ.क्र.१ ते ७) | २४ |
| १३ | परिशिष्ट क्र-३ | कामाच्या परिरक्षण व देखभालीच्या हमीपत्राचा नमुना | २५ |
| १४ | परिशिष्ट क्र-४ | आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या कामांवर लावावयाच्या फलकाचा नमुना | २६ |
| १५ | परिशिष्ट क्र-५ | आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेतलेल्या कामांच्या जिल्हास्तरीय पथकाकडून केलेल्या तपासणीसंबंधीचा त्रैमासिक अहवालाचा नमुना | २७ |
| १६ | परिशिष्ट क्र-६ | आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत पाठवावयाच्या त्रैमासिक अहवालाचा नमुना | २८ |
| १७ | परिशिष्ट क्र-७ | आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत खर्च ताळमेळ घेऊन पाठवावयाच्या अहवालाचा नमुना | २९ |
| १८ | परिशिष्ट क्र-८ | आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचे शिर्षवार वर्गीकरण | ३० ते ३४ |

३. माहिती व तंत्रज्ञान विभागाने, ई-निविदा कार्यप्रणाली अंवलंबिण्यासाठी दि. ६ ऑगस्ट, २०१०, १९ जानेवारी, २०१३, २६ नोव्हेंबर, २०१४ व दि. १८ डिसेंबर, २०१४ रोजी शासन निर्णय निर्गमित करून सद्यस्थितीत ₹ ३.०० लाखापेक्षा अधिक खर्चाच्या कामांना ई-निविदा कार्यप्रणाली लागू केलेली आहे. तथापि, आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांसाठी सदर ई-निविदेच्या आर्थिक मर्यादेची अट ₹ ३.०० लक्ष वरून ₹ १०.०० लक्ष पर्यंत वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याचप्रमाणे सदर बाब खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या कामांसाठी लागू करण्याच्या दृष्टीने खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या दि.१५ मे, २०१४ रोजीच्या मार्गदर्शक तत्वांतील परिच्छेद क्र.२.६ मधील तरतूदीच्या आधारे ई-निविदेच्या आर्थिक मर्यादेची अट ₹ ३.०० लक्ष वरून ₹ १०.०० लक्ष पर्यंत वाढविण्यासही या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०७०५१५३९३९२७१६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

१२.७.१६

( दिनेश पोखरकर )
शासनाचे कार्यासन अधिकारी

प्रत अग्रेषित,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव.

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
४) मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
५) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा / मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद ,
६) मा. विधानसभा / मा. विधानपरिषद सदस्य (सर्व),
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
८) मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव(सर्व),
९ सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०) विभागीय आयुक्त, (सर्व),
११) जिल्हाधिकारी, (सर्व),
१२) नियोजन विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव,
१३) सर्व उप आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्तांची कार्यालये,
१४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१५) मुख्य अभियंता, (सर्व) सार्वजनिक बांधकाम विभाग,
१६) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
१७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
१८)महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
१९) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२१) सर्व जिल्हा नियोजन अधिकारी,
२२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२३) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२४) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२
२५) बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१,
२६) भारतीय जनता पाटी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक क्र.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई-२०,
२७) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५,
२८) नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईन्ट, मुंबई-२१ (५ प्रती),
२९) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८,
३०) निवड नस्ती/का-१४८२, मंत्रालय, मुंबई.